<u>प्रेसनोट दि.२१/१०/२०२०</u>

## रिक्षाचालक यांनी रिक्षा चालवितांना गणवेश, लायसन्स इत्यादीबाबत.

पिंपरी चिचंवड वाहतूक शाखेकडुन आवाहन करण्यात येत आहे की, सध्या कोरोना विषाणु संसर्ग संचारबंदी शिथिल केल्याने रिक्षा चालकांना सोशल डिस्टंसिंग ठेवुन प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी दिली आहे. परंतु मोठया प्रमाणावर रिक्षा चालक हे गणवेश परिधान न क़रता तसेच बॅच बिल्ला, लायसन्स व रिक्षाचे कागदपत्रे जवळ न बाळगता प्रवासी वाहतूक करतांना आढळुन येत आहेत. तसेच चौकांमध्ये व रस्त्यावर रिक्षा अस्तव्यस्त पार्किंग करुन उभे राहिलेले दिसुन येतात त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात रिक्षा चालकांची व वाहतूकीची प्रतिमा मलिन होत आहे. तसेच कोरोना विषाणु संसर्गच्या अनुषांगाने मास्क, सॅनिटायजर व रिक्षा चालक व प्रवासी मध्ये प्लॅस्टिक पडदा इ. वापर करणे बंधनकारक आहे.

तरी सर्व रिक्षा चालक/मालक यांनी दि.२१/१०/२०२० पासुन ७ दिवसात स्वच्छ गणवेश,बॅच बिल्ला, लायसन्स व रिक्षाचे कागदपत्रे याची पुर्तता करावी. तदनंतर वाहतुक शाखेकडुन कडक कारवाई करण्यात येईल.

(श्रीकांत डिसले)
सहा.पोलीस आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर